# महाराष्ट्र विधानसभा

# दिवसाच्या कामकाजाचा क्रम

**शुक्रवार, दिनांक २० डिसेंबर, २०२४**

**(सकाळी ११.०० वाजता)**

**एक : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**मुख्यमंत्री :** **(क)** मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती, कळंबोली, ता. पनवेल यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा बत्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचे सन २०२१-२०२२ व सन २०२२-२०२३ या कालावधीच्या लेख्यावरील भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांचा अलग लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा पंचवीसावा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ङ)** तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांचा सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२ चा स्वतंत्र लेखापरीक्षा व त्यावरील अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(च)** विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा सव्वीसावा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(छ)** विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचा सन २०२०-२०२१, सन २०२१-२०२२ व सन २०२२-२०२३ करीताचा अलग लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

अप्रकाशित

**(ज)** कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(झ)** महाराष्ट्र मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ञ)** मुंबई रेल्वे विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ट)** नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेड यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा आठवा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ठ)** हुतात्मा शिवराम हरी राजगुरु यांचे जन्मस्थळ असलेल्या खेड येथील वाडयाचे राष्ट्रीय दर्जाचे स्मारक व्हावे." या विषयावरील श्री.दिलीप मोहिते-पाटील व इतर वि.स.स. यांच्या दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी म.वि.स. नियम १०५ अन्वये झालेल्या लक्षवेधी सूचनेच्या चर्चेदरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार हुतात्मा शिवराम हरी राजगुरु जन्मस्थळ परिसर विकास आराखड्यासंदर्भातील प्रगती अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ड)** लोकलेखा समितीच्या सन २००१-२००२ च्या आठव्या अहवालातील परिच्छेद १.२८ नुसार मंत्रालयीन सर्व विभागांनी केलेल्या सन २०२३-२०२४ या वित्तीय वर्षातील पुनर्विनियोजनाबाबतच्या माहितीचे एकत्रित विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

**दोन : औचित्याचे मुद्दे**

**तीन : अल्पकालीन चर्चा (म.वि.स. नियम १०१ अन्वये) :-**

**(गुरुवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२४ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली म.वि.स. नियम १०१ अन्वये अल्पकालीन चर्चा)**

सर्वश्री. नानाभाऊ पटोले, सुनिल प्रभू, विजय वडेट्टीवार, डॉ. जितेंद्र आव्हाड, डॉ.नितीन राऊत, श्रीमती नमिता मुंदडा, श्री. संदिप क्षिरसागर, श्री. अबु आझमी, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील :- **(मंत्र्यांचे उत्तर)**

"परभणी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा परिसरातील संविधान प्रतिकृतीची तोडफोड करण्यात आल्याने परभणी शहरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असल्याचे दिनांक ११ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे,

या प्रकरणी नवामोंढा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविलेला असणे, या घटनेच्या निषेधार्थ पुकारलेल्या बंदला हिंसक वळण लागून खाजगी व सार्वजनिक मालमत्तेचे मोठया प्रमाणात नुकसान होण्यासह जनजीवन विस्कळीत होणे, या प्रकरणी शहरातील अनेकांची पोलीसांनी धरपकड केली असणे, दगडफेक प्रकरणी न्यायालयीन कोठडीत असलेल्या विधी महाविद्यालयामधील विद्यार्थी असलेल्या तरुणाचा कारागृहात दिनांक १५ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाला असल्याचे निदर्शनास येणे, या घटनेमुळे आंदोलन पुन्हा सुरु होणे, तसेच बीड जिल्हयातील केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच यांचे दिनांक ९ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास अपहरण करुन हत्या करण्यात आलेली असणे, या गुन्हयातील सात आरोपींना अटक करण्यात येणे मात्र या गुन्हयातील मुख्य सूत्रधाराला अद्याप अटक झालेली नसणे, यामुळे जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, या दोन्ही गंभीर घटनांची शासनाने तातडीने चौकशी करुन करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**चार : सन २०२४-२०२५ या वर्षाच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान (दुसरा व शेवटचा दिवस)**

(१) नगरविकास विभाग

(२) सार्वजनिक आरोग्य विभाग

**(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)**

**(चर्चारोध (गिलोटीन) सायंकाळी ०५.३० वाजता)**

**पाच : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ, विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५ – महाराष्ट्र (तृतीय पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२४

---

**(ब) विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

(१) (क) **सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ – महाराष्ट्र कारागृहे व सुधार सेवा विधेयक, २०२४**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ – महाराष्ट्र कारागृहे व सुधार सेवा विधेयक, २०२४ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. नाना पटोले, विजय वडेट्टीवार, डॉ.नितीन राऊत, श्री.अमिन पटेल, डॉ.विश्वजीत कदम, सर्वश्री अमित झनक, विकास ठाकरे व हेमंत ओगले, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ – महाराष्ट्र कारागृहे व सुधार सेवा विधेयक, २०२४ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(२) (क) **सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ – महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा विधेयक, २०२४**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ – महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा विधेयक, २०२४ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. नाना पटोले, विजय वडेट्टीवार, डॉ.नितीन राऊत, श्री.अमिन पटेल, डॉ.विश्वजीत कदम, सर्वश्री अमित झनक, विकास ठाकरे व हेमंत ओगले, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ – महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा विधेयक, २०२४ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**सहा : म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

**(गुरुवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२४ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री रणधीर सावरकर, अब्दुल सत्तार, चेतन तुपे, सुधीर मुनगंटीवार, तानाजी सावंत, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री रविंद्र चव्हाण, अर्जुन खोतकर, शेखर निकम, नारायण कुचे, विजय शिवतारे, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री संभाजी निलंगेकर-पाटील, प्रकाश सुर्वे, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री प्रवीण दटके, मंगेश कुडाळकर, दिलीप बनकर, अतुल भातखळकर, नरेंद्र भोंडेकर, चंद्रकांत नवघरे, समीर कुणावार, संजय गायकवाड, श्रीमती सना मलिक, सर्वश्री सुरेश खाडे, बालाजी कल्याणकर, संतोष बांगर, अभिमन्यू पवार, प्रदिप जैस्वाल, रमेश बोरनारे, बबनराव लोणीकर, सुहास कांदे, दिलीप लांडे, विजय देशमुख, महेंद्र थोरवे, महेंद्र दळवी, सुभाष देशमुख, महेश शिंदे, चंद्रकांत सोनवणे, डॉ. संजय कुटे, सर्वश्री निलेश राणे, अमोल पाटील, राणाजगजितसिंह पाटील, श्रीमती रंजना जाधव, सर्वश्री सुहास बाबर, प्रकाश भारसाकळे, हरिष पिंपळे, कृष्णा खोपडे, समीर मेघे, किर्तीकुमार भांगडीया, मोहन मते, सुधीर गाडगीळ, तुषार राठोड, सुरेश भोळे, तानाजी मुटकुळे, विजय रहांगडाले, श्रीमती श्वेता महाले, सर्वश्री प्रताप अडसड, मंगेश चव्हाण, राजेश पाडवी, राजेश पवार, सुरेश धस, सर्वश्रीमती देवयानी फरांदे, मोनिका राजळे, सीमाताई हिरे, सर्वश्री प्रशांत बंब, काशिराम पावरा, योगेश सागर, संतोष दानवे, भीमराव केराम, दिलीप बोरसे, ॲड.राहुल ढिकले, सर्वश्री सचिन कल्याण-शेट्टी, समाधान आवताडे, श्रीमती नमिता मुंदडा, सर्वश्री सुनील कांबळे, सिध्दार्थ शिरोळे, मिहिर कोटेचा, गोपिचंद पडळकर, रमेश कराड, ॲड.राहुल कुल, सर्वश्री अमित साटम, संजय केळकर, राम कदम, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"सन २०१४ ते २०१९ या कालावधीत तत्कालीन सरकारने राज्यातील जनतेच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे असणारे परंतु अनेक वर्षांपासून प्रलंबित असणारे प्रकल्प जसे की, नवी मुंबई विमानतळ, शिवडी न्हावाशेवा सागरी महामार्ग, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदू मिल येथील स्मारक, विदर्भातील सिंचनाचा अनुशेष इ. प्रकल्पांना गती देणे, परिणामी आज हे सर्व महत्वाकांक्षी प्रकल्प दृष्टीक्षेपात येणे, नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये परत महायुती सरकार सत्तेवर आल्याने, विदर्भ मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेमध्ये राज्यातील जनतेसाठी विशेषतः शेतकऱ्यांसाठी महत्वाचे असणारे वैनगंगा-नळगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्प, मराठवाडा वॉटर-ग्रीड, POCRA टप्पा-२ तसेच जलयुक्त शिवार टप्पा-२ सारखे महत्वाकांक्षी प्रकल्प तातडीने मार्गी लागतील अशी आशा निर्माण होणे, राज्यातील शेतकऱ्यांच्या विशेषतः विदर्भातील शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्वाचे असणाऱ्या

वैनगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्पाला, तत्वतः मान्यता गत महायुती सरकारने दिलेली असल्याने, हा प्रकल्प तातडीने सुरू करून विदर्भातील सर्व शेतकऱ्यांसाठी सिंचनाची सुविधा कायमस्वरूपी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता; त्याकरीता या प्रकल्पाची कालबध्द रीतीने अंमलबजावणी करावी, अशी जनतेमधून होत असलेली मागणी, विदर्भ तसेच मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दुष्काळी परिस्थितीची झळ कमी व्हावी, याकरीता महाविकास आघाडी सरकारच्या कालावधीत कार्यवाही न झालेल्या जलयुक्त शिवार टप्पा-२, तसेच नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (POCRA) टप्पा-२ ह्या प्रकल्पांची अंमलबजावणी तातडीने सुरू करण्याची शेतकरी बांधवांकडून होत असलेली मागणी, तसेच विदर्भ, मराठवाड्यातील अनुशेष दूर व्हावा याकरीता विविध प्रकल्पांना गती देण्याची आवश्यकता, संपूर्ण राज्यातील शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्वाचे असणारे पांदण रस्ते तातडीने पूर्ण व्हावेत याकरीता "मातोश्री पांदण रस्ते" योजनेमध्ये शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने बदल करून, या योजनेची अंमलबजावणी सुटसुटीत व्हावी याकरीता आवश्यक ते प्रयत्न करण्याची आवश्यकता, मराठवाड्यातील जनतेसाठी महत्वाचा असणारा "मराठवाडा वॉटर ग्रीड" या महत्वाकांक्षी प्रकल्पास महायुती सरकारने २०१९ मध्येच तत्वतः मान्यता देणे, परंतु महाविकास आघाडी सरकारच्या कालावधीत या प्रकल्पावर कार्यवाही न होणे, आता परत महायुती सरकार सत्तेवर आल्याने ह्या प्रकल्पाला देखील गती मिळावी अशी मराठवाड्यातील जनतेची होत असलेली मागणी; विदर्भ, मराठवाडा व खानदेशातील जनतेच्या आयुष्यात खऱ्या अर्थाने समृध्दी आणणारा "हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे" समृध्दी महामार्ग महायुती सरकारच्या कालावधीत सुरू होणे, या महामार्गाच्या शेवटच्या टप्प्याचे लोकार्पण होऊन हा महत्वाकांक्षी महामार्ग जनतेच्या सेवेसाठी तातडीने उपलब्ध व्हावा अशी संपूर्ण राज्यातील जनतेकडून होत असलेली मागणी, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी महायुती सरकारने हमी भावाने सोयाबीनची विक्रमी खरेदी करणे, परंतु शेतकऱ्यांची वाढती मागणी लक्षात घेता सदर खरेदी जानेवारीपर्यंत सुरू रहावी अशी शेतकरी बांधवांकडून होत असलेली मागणी, राज्य शासनाने राज्यातील शेतक-यांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी कृषी पंपांना मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना, २०२४ अंतर्गत अधिकचा देण्यात आलेला लाभ, तसेच नमो शेतकरी महासन्मान निधी अंतर्गत थेट लाभ, त्याचबरोबर राज्यातील सर्व शेतकरी बांधवांना दिवसा वीज मिळावी, याकरीता राज्यातील सर्व सबस्टेशन्सच्या परिसरात सोलर पार्क उभारण्याच्या योजनेला गती देण्याची आवश्यकता, शेतकरी बांधवांच्या या विविध समस्या सोडविण्याकरीता शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही, विदर्भातील शेतक-यांसाठी मूल्यसाखळी निर्माण होऊन त्यांचे शेतमालास चांगला दर मिळावा याकरिता SMART व MAGNET सारखे प्रकल्प विदर्भामध्ये प्राधान्याने मान्यता देऊन सुरु करण्याची आवश्यकता, तसेच रोजगाराच्या विविध

संधी उपलब्ध व्हाव्यात याकरिता उद्योग विभागाची समूह विकास योजना विदर्भामध्ये प्राधान्याने राबविण्याची आवश्यकता, शेतक-यांना दिलासा देण्यासाठी सोयाबीनची जास्तीत जास्त खरेदी यावर्षी होण्याची आवश्यकता, महायुतीचे सरकार परत सत्तेवर आल्याने मुंबईसह MMRDA परिसरातील महत्वाचे पायाभूत सुविधांचे प्रकल्प, जसे की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, कोस्टल रोड, उर्वरीत मेट्रो प्रकल्प व इतर प्रकल्प तातडीने सुरू होऊन जनतेच्या सेवेत उपलब्ध होण्यासाठी तातडीने करावयाची कार्यवाही व त्यावर करावयाच्या शासकीय उपाययोजना."

**सात : अंतिम आठवडा प्रस्ताव :-**

**(गुरुवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२४ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री भास्कर जाधव, नानाभाऊ पटोले, जयंत पाटील, आदित्य ठाकरे, विजय वडेट्टीवार, सुनिल प्रभू, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री दिलीप सोपल, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री. रोहित पाटील, अजय चौधरी, अमित देशमुख, रोहित पवार, अमीन पटेल, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री. अमित झनक, अस्लम शेख, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री. कैलास घाडगे पाटील, विकास ठाकरे, नितीन देशमुख, सुनिल राऊत, शिरीषकुमार नाईक, संजय पोतनीस, साजिद खान पठाण, वरुण सरदेसाई, हेमंत ओगले, अनंत (बाळा) नर, संजय मेश्राम, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री. हारुन खान, रामदास मसराम, सिध्दार्थ खरात, अनिल मंगुळकर, महेश सावंत, गजानन लवटे, प्रविण स्वामी, संजय देरकर, बाबाजी काळे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव :**

"राज्याच्या आदिवासी भागातील माता व बालकांचे मृत्यू कमी व्हावेत या उद्देशाने आदिवासी भागात फिरत्या वैदयकिय पथकांव्दारे नवसंजीवनी योजना राबविण्यात येणे, तरी देखील राज्यात आदिवासी माता व बालमृत्यूचे वाढते प्रमाण, या वाढत्या माता बालमृत्यूच्या प्रमाणाची आरोग्य व आदिवासी विभागाने घ्यावयाची गंभीर दखल, शासकीय रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टर व नर्ससेची असलेली कमतरता, ग्रामीण भागात एमबीबीएस डॉक्टर मिळत नसल्याने पर्यायी व्यवस्था करणे, राज्यात मलेरिया, डेंग्यू, स्वाईन फ्ल्यू इत्यादी रोगांच्या साथी आटोक्यात आणण्यासाठी शासनाने करावयाची उपाययोजना, मुंबईतील वांद्रे पूर्व येथील शासकीय वसाहतीतील रहिवाश्यांना माहे मे, २०२५ अखेरपर्यंत राहती निवासस्थाने रिक्त करण्याबाबत दिलेल्या नोटीसा, मार्च-एप्रिल-मे, महिन्यात शालेय व महाविदयालयीन परिक्षांचा कालावधी असल्याने निवासस्थाने रिक्त करणे अशक्य असणे, याकरिता निवासस्थाने रिक्त करण्यासाठी मुदतवाढ देण्यात यावी, राज्यातील पाणीपुरवठा कार्यक्रमाचा नियोजनबध्दरितीने विकास व

अंमलबजावणी करण्यासाठी स्थापन केलेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सिंगापूर व मलेशियातील अग्रेसर संस्थांशी करार करण्यात येणे, या कराराअंतर्गत राज्यात घेण्यात आलेल्या योजना, राज्यामध्ये ड्रग्ज आणि अंमलीपदार्थांचे सेवन करण्याचे प्रमाण विशेषत: तरुणांमध्ये वाढत असणे, राज्यात महिलांवरील अत्याचार, लहान मुलांचे अपहरण, हत्या, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान इत्यादी गुन्हयांचे देखील प्रमाण वाढते असणे, विदर्भ-मराठवाडा-खानदेश व पश्चिम महाराष्ट्रातील सोयाबीन, धान, संत्रा, तूर, कापूस इत्यादी हमी भावापेक्षा कमी भावात खरेदी करण्यात येणे, खरेदी केंद्रे उशिरा सुरु झाल्याने शेतकऱ्यांना आपला माल खाजगी व्यापा-यांना कमी दरात विकावा लागणे, नाशिक, जळगांव भागात द्राक्ष आणि कोकणामध्ये आंबे, काजू आणि विदर्भात संत्रा व धान इत्यादी पिकांचे अवकाळी पावसामुळे झालेले नुकसान, राज्यातील मोठया प्रमाणावर उद्योगधंदयाचे इतर राज्यात स्थलांतर होत असणे, मुंबईतील बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उदयानाच्या जमिनीवरील २५ हजार झोपडयांचे आरे कॉलनीच्या ९० एकर जमिनीवर पुनर्वसन करुन त्यांना नागरी सुखसोयी पुरविण्याचे म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी दिलेले अंडरटेकिंग, सदर पुनर्वसनासाठी बांधावयाच्या घरांची निविदा प्रक्रिया दिनांक १ डिसेंबर, २०२४ रोजी सुरु होईल असे सांगूनही अदयापपर्यंत कोणतीही निविदा काढण्यात आली नाही. सदर जमीन महसूल विभागाची असल्याने सदर जमीन महसूल विभागाकडून म्हाडाकडे वर्ग करण्यासाठी कार्यवाही करण्याची आवश्यकता, ठाणे महानगरपालिकेचा शहरावर अन्याय करणारा नवीन डीपी, टोरंट कंपनीची भरमसाठ वीज बिले, ठाणे शहरातील कचऱ्यासाठी डंपिंग ग्राऊंडचा आणि पाण्याचा प्रश्न तीव्र असणे, नवीन डंपिंग ग्राऊंड करण्याची व रहिवाश्यांना पुरेसा पाणीपुरवठा करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अग्रिम

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : १९ डिसेंबर, २०२४

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा